| | | | |
|---|---|---|---|
| MHRT050002752020 | दाखल तारीख | : | १२.०३.२०२० |
| | नोंदणी तारीख | : | १२.०३.२०२० |
| | निकाल तारीख | : | १०.०३.२०२६ |
| | कालावधी | : | वर्ष महिने दिवस<br>०५ ११ २९ |

भाग 'अ'
(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (i))

**खेड येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात**

**(पिठासिन अधिकारी श्री. एस. एम. चव्हाण)**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खेड, ता.खेड, जि.रत्नागिरी.**

**(जाहीर दिनांक: १०.०३.२०२६)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१३६/२०२०**

(गु.र.क्र.४९/२०१९, रा.उ.शु., खेड)

**निशाणी क्र.८ लगत**

**फिर्यादी** **महाराष्ट्र सरकार**
**तर्फे निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, खेड विभाग**
ता.खेड, जि. रत्नागिरी.

**प्रतिनिधीत्व** **सहाय्यक सरकारी अभियोक्ता सौ.व्ही.जी.गायकवाड.**

**आरोपी** **अविनाश नारायण चव्हाण,**
वय – ४८ वर्षे,
रा.मु.बोरघर, ब्राम्हणवाडी, पो.चिंचवली, ता.खेड, जि.रत्नागिरी.

**प्रतिनिधीत्व** **आरोपीकरीता वकील श्री.एस.एस.शेठ.**

भाग 'ब'
(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (ii))

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | ०३.०४.२०१९ |
| फिर्याद पोलीस ठाण्यात नोंद झाल्याची तारीख | ०३.०४.२०१९ |

| | |
|---|---|
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केल्याची तारीख | १२.०३.२०२० |
| आरोपीविरुध्द दोषारोप ठेवल्याची तारीख | १९.०४.२०२४ |
| पुरावा नोंदविण्यास प्रारंभ केल्याची तारीख | २०.०३.२०२५ |
| निकालाची आरक्षीत तारीख | -- |
| निकालाची तारीख | १०.०३.२०२६ |
| जर शिक्षा दिली तर त्या आदेशाची तारीख | लागू नाही. |

**आरोपीचा तपशिल**

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोप ठेवलेले गुन्हे | निर्दोष मुक्त केले की शिक्षा केली | दिलेली शिक्षा | फौप्रसं कलम ४२८ करिता संपरीक्षे दरम्यान निरुध्द केलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **अविनाश नारायण चव्हाण** | ०३.०४.२०१९ | ०३.०४.२०१९ | महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) प्रमाणे | निर्दोष मुक्त केले. | -- | निरंक |

# न्यायनिर्णय

## (घोषित दिनांक १०.०३.२०२६)

प्रस्तुतचा खटला, आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्याकरिता चालविण्यात आला.

**०२.** अभियोग पक्षाकडून केवळ एक पंच साक्षीदार गणपत आत्माराम जाधव यांना तपासण्यात आले. त्यांच्या साक्षीतून आरोपींविरुद्ध दोषी पुरावे मिळून आल्याने आरोपीचे भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम ३५१ नुसार निवेदन (निशाणी ८ लगत) नोंदविण्यात आले.

**०३.** अभियोग पक्षाची हकीकत, अभिलेखावरील पुरावा व आरोपीचा बचाव विचारात घेता, मी खालील मुद्दे उपस्थित केलेले आहेत, त्यावरील माझे निष्कर्ष मी त्या करिताचे कारणांसह विस्तृत करीत आहे.

| अ.क्र. | विचारार्थ मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, | |

| अ.क्र. | विचारार्थ मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| | दि.०३.०४.२०१९ रोजी ११:२० वा. मौजे बोरघर, ब्राम्हणवाडी, ता.खेड, जि.रत्नागिरी येथे आरोपी हा त्याचे राहते घराचे मागील पडवीत त्याच्या ताब्यात सु.२० लि. मापाच्या कॅनमध्ये १८ लि. गावठी हातभट्टी दारु, सहा स्टीलची काचेची ग्लासे व एक प्लॅस्टीक बादली असा मुद्देमाल बेकायदेशीरपणे बाळगताना मिळून आला व त्याद्वारे त्याने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) प्रमाणे शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला? | नाही. |
| २. | आदेश काय ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमिमांसा

**०४.** आरोपीविरुध्द निश्चित केलेला गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने या न्यायनिर्णयाच्या 'भाग क' मधील साक्षी पुराव्यांवर भिस्त ठेवली आहे.

**०५.** मी अभियोग पक्षातर्फे सौ.व्ही.जी.गायकवाड, सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपीकरिता विधीज्ञ श्री.एस.एस.शेठ यांचा युक्तिवाद ऐकला.

## विचारार्थ मुद्दा क्र.१ व २ करीता–

**०६.** प्रस्तुत खटल्यात अभियोग पक्षाकडून केवळ एक पंच साक्षीदार गणपत आत्माराम जाधव यांना तपासण्यात आले. सदर साक्षीदार यांनी त्यांच्या साक्षीमध्ये कथन केले आहे की, दि.०३.०४.२०१९ रोजी तो तसेच दुसरा पंच विजय सावंत व राज्य उत्पादन शुल्क खेड विभागाचे दुय्यम निरीक्षक श्री. सकपाळ तसेच त्यांचा

कार्यालयीन स्टाफ अशा सर्वांनी मौजे बोरघर, धामणवाडी येथे जावून मिळालेल्या माहितीनुसार आरोपी अविनाश चव्हाण याच्या राहत्या घरी छापा टाकला. तेथे एक इसम त्याच्या पुढ्यात २० लि. मापाचा एक प्लॅस्टीक कॅन, सात स्टीलची ग्लासे व एक प्लॅस्टीक बादली असा मुद्देमाल बाळगताना मिळून आला. जवान निनाद सुर्वे व निरीक्षक श्री. सकपाळ यांनी स्टाफच्या मदतीने त्या इसमास जागीच पकडून त्याच्याजवळील कॅनची पाहणी केली असता सदर कॅनमध्ये हातभट्टी गावठी दारु मिळून आली. तसेच सदर साक्षीदाराने पुढे असे कथन केले की, मिळून आलेल्या कॅनमधून १८० मि.ली. मापाच्या दोन स्वच्छ व कोरड्या बाटल्यांमध्ये नमुने घेण्यात आले. नमुना बाटल्यांवर तसेच कॅनच्या बुचांवर पंचांच्या व दुय्यम निरीक्षक सकपाळ यांच्या सह्यांची लेबले लावून लाखेने सिल केले. सदर कारवाईचा जागीच पंचनामा करण्यात आला व जप्त मुद्देमाल दुय्यम निरीक्षक श्री. सकपाळ यांनी त्यांच्या ताब्यात घेतला. पंचनाम्यावर दोन्ही पंचांच्या सह्या घेण्यात आल्या. अभियोग पक्षाने सदर साक्षीदारकडून पंचनामा (निशाणी ११) सिध्द करुन घेतला. अभियोग पक्षाने सदर साक्षीदाराकडून आरोपीची ओळख पटवुन घेतली आहे. उलटतपासादरम्यान सदर साक्षीदाराने त्यांनी व विजय सावंत यांनी राज्य उत्पादन शुल्क खेड विभागाकरीता अनेक प्रकरणात पंच म्हणून काम केलेले आहे, तसेच जप्त मुद्देमाल साक्षीच्या वेळी त्यांच्यासमक्ष हजर केलेला नाही, तसेच ज्या बाटल्यांमध्ये नमुना घेण्यात आला होता त्या बाटल्या स्वच्छ, कोरड्या होत्या व त्यांचे निर्जंतुकीकरण केलेले होते याबाबत वेगळा पंचनामा केला होता ह्या बाबी मान्य केल्या आहेत.

**०७.** एकंदरीत सदर साक्षीदाराची साक्ष अभियोग पक्षाच्या हकिकतशी सुसंगत असून त्यांनी घटनेची, तारीख, वेळ व ठिकाण याचे वर्णन फिर्याद व पंचनाम्याप्रमाणे अचूकपणे सांगितले आहे. सबब, अभियोग पक्ष सदर साक्षीदाराकडून पंचनामा सिध्द करु शकले. सदर साक्षीदाराने आरोपीला न्यायालयासमक्ष ओळखले आहे. असे असले

तरीही सदर साक्षीदाराने उलटतपासात सांगितल्याप्रमाणे त्याने अनेक वेळा पंच म्हणून साक्ष दिली आहे. यावरुन सदर साक्षीदाराची साक्ष निष्पक्ष असण्यावर साशंकता निर्माण होते. सदर साक्षीदाराच्या पुष्टीसाठी इतर साक्षीदारांची साक्ष नोंदवणे अभियोग पक्षाला आवश्यक होते. अभियोग पक्षाला मुबलक संधी देऊनही फिर्यादी, दुसरा पंच साक्षीदार व तपास अधिकारी यांना न्यायालयासमक्ष हजर ठेवून शकले नाहीत.

०८. अभिलेखाचे अवलोकन केले असता त्यामध्ये न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेचा अहवाल दिसून येतो, परंतु तो अभियोग पक्षाने सिध्द केलेला नाही. अभियोग पक्ष समन्स काढूनही इतर साक्षीदारांना साक्ष कामी हजर करु शकले नाही. अभियोग पक्षाने फिर्याद सिध्द केली नाही. तसेच राज्य उत्पादन शुल्क खेड विभागाच्या अधिकाऱ्यांनी कारवाई केल्यानंतर राखून ठेवलेला नमुना तो न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेत पाठविला तोपर्यंत कोणाच्या ताब्यात होता व तो नमुना प्रयोगशाळेत कोणी जमा केला ह्या बाबी सिध्द झालेल्या नाहीत. अशा परिस्थितीत केवळ साक्षीदार गणपत जाधव यांची साक्ष आरोपीविरुध्दचा गुन्हा शाबित करण्याइतपत पुरेसे ठरत नाही. सबब, मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदवितो व मुद्दा क्र.२ करीता खालील आदेश पारित करतो.

## <u>आदेश</u>

१. आरोपी **अविनाश नारायण चव्हाण** यांची महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) प्रमाणे शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्याच्या आरोपातून भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७८(१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. सदर गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल यापुर्वी नाश केला नसल्यास अपिल कालावधी संपल्यानंतर अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, रत्नागिरी यांच्याकडे विल्हेवाटीसाठी पाठविण्यात यावा.

३. आरोपीचे वैयक्तिक बंधपत्र पुढील सहा महिन्याकरीता लागू राहील.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात उद्घोषित करण्यात आला.)

CHAVAN SANJAY MOTIRAM
Digitally signed by CHAVAN SANJAY MOTIRAM
Date: 2026.03.10 16:51:35 +0530

**(एस. एम. चव्हाण)**

**दिनांकः १०.०३.२०२६** प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खेड,

ता.खेड, जि.रत्नागिरी.

भाग 'क'
(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (**iii**))

## सरकारी/बचाव/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

### अ. सरकारी

| क्रमांक | नाव | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| अ.सा.१ | गणपत आत्माराम जाधव | पंच साक्षीदार | ८ लगत |

### ब. बचावाचे साक्षीदार

| क्रमांक | नाव | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| **नाही.** | | | |

### क. न्यायालयीन साक्षीदार

| क्रमांक | नाव | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| **नाही.** | | | |

## सरकारी/बचाव/न्यायालयीन कागदोपत्री निशाणांची यादी

### अ. सरकारी

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | ११/अ.सा.क्र.१ | पंचनामा |

### ब. बचाव

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| **नाही.** | | |

### क. न्यायालयीन निशाण्या

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| **नाही.** | | |

### मुद्देमाल

| क्रमांक | मुद्देमाल वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | -- | सु.२० लि. मापाच्या एका प्लॅस्टीक कॅनमध्ये १८ लि. हातभट्टी गावठी दारु |
| २. | -- | सहा स्टीलची ग्लासे |
| ३. | -- | एक प्लॅस्टीक बादली |

CHAVAN SANJAY MOTIRAM
Digitally signed by CHAVAN SANJAY MOTIRAM
Date: 2026.03.10 16:51:45 +0530

**(एस. एम. चव्हाण)**

दिनांकः १०.०३.२०२६

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खेड,
ता.खेड, जि.रत्नागिरी.

CERTIFICATE

| | | |
|---|---|---|
| Case No. | : | S.C.C. No.136/2020 |
| I affirm that the contents of this pdf file order are same word as per original Judgment/order. | | |
| Name of Stenographer | : | Sou. S. J. Salunkhe |
| Court Name | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C. Court, Khed. |
| Date of Decision | : | 10.03.2026 |
| Judgment/Order signed by Presiding Officer on | : | 10.03.2026 |
| Judgment/Order uploaded on | : | 10.03.2026 |